**<u>नियमित दिवाणी कज्जा क्र.१४३/२०१९ मधील नि.क्र. २३ वरील</u>**

**<u>आदेश</u>**

( पारीत दिनांक – २४/११/२०२२)

श्री. जोतिराम शंकर चांभार (ननवरे) वगैरे वि. श्री. तुकाराम शंकर चांभार (ननवरे) वगैरे.

**CNR -MHKO130010142019**

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १ ते ६ यांनी त्यांच्याविरुध्द झालेला 'कैफियत नाही' हा आदेश रद्द करुन मिळणेकरीता दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादीच्या कथनानुसार, प्रस्तुतचा दावा वादी यांनी हक्कज्ञापनाकरीता, कायम मनाईकरीता प्रतिवादी यांचेविरुध्द दाखल केलेला आहे. सदरकामी आवश्यक असणारी कागदपत्रे तसेच राज्यात सलग दोन वर्षे कारोनाच्या प्रादुर्भावामुळे राज्य सरकारने सलग दोन वर्षे लॉकडाऊन जाहीर केल्यामुळे कोर्टाचे कामकाज पूर्णपणे बंद होते. त्यामुळे, यातील प्रतिवादी क्र. १ ते ६ यांना वेळेत कैफियत व म्हणणे देता आले नाही. दरम्यानचे काळात यातील प्रतिवादी क्र. २ या आजारपणामुळे मयत झाल्या आहेत. सदर कामी यातील प्रतिवादी क्र. १, ३ ते ६ हे प्रत्येक तारखेस हजर झालेले आहेत व त्यांची कैफियत दाखल करीत आहेत. यातील प्रस्तुत प्रतिवादी क्र. १, ३ ते ६ यांनी जाणूनबुजून दावेस कैफियत देणेस विलंब केलेला नाही. प्रतिवादी क्र. १ हे नोकरीनिमित्त मुंबई येथे स्थायीक आहेत. तसेच, प्रतिवादी क्र. २ अलिकडेच मयत झालेल्या आहेत. प्रतिवादी क्र. ३ ते ६ हे अशिक्षीत असल्याने त्यांना कायदयाचे ज्ञान नाही. त्यामुळे, मुदतीमध्ये त्यांना कैफियत व म्हणणे द्यावे लागते याबाबत त्यांना कल्पना नाही. प्रतिवादींनी कैफियत देणेचे जाणून–बूजून व हेतूपुरस्सर टाळलेले नाही. सबब, वरील सर्व कारणास्तव कैफियत दाखल करण्यास उशीर झाला आहे. त्यामुळे, तो रद्द करुन मिळणेकरीता सदरचा अर्ज दाखल करण्यात आला आहे.

३. सदर अर्जावरती वादीतर्फे त्यांचे म्हणणे अर्जाच्या मागील बाजूस दाखल करण्यात आले असून, यातील प्रतिवादींच्या अर्जाचे अवलोकन करता, सदरच्या अर्जामध्ये केलेली कथने खोटी, लबाडीची व चुकीची असल्याने तसेच केवळ सदरचा दाव्यास प्रलंबित ठेवण्यासाठी व दाव्यास विलंब करण्याचे उद्देशाने दिलेला असून, सदरचा अर्ज नामंजूर करण्यात यावा. तसेच, मंजूर करण्यचा झाल्यास प्रतिवादी यांना रक्कम रु. ५,०००/– खर्च म्हणून बसविणेत यावे असे वादीचे कथन आहे.

४. उभय बाजूंच्या वकीलांचा युक्तिवाद ऐकला.

**५.** प्रस्तुत प्रकरणी प्रतिवादी क्र. १ ते ६ यांचे विरुध्द 'विना कैफियत' आदेश पारित करण्यात आलेला नाही असे दिसून येते. मात्र, निश्चितपणे, कैफियत दाखल करण्यास कायद्याने विहित केलेला कालावधी उलटून गेला आहे असे दिसून येते. त्यामुळे, कैफियत दाखल करण्यास निश्चितच विलंब झाला आहे हे स्पष्ट आहे. सन २०२०–२०२१ या कालावधीत कोरोना महामारीमुळे न्यायालयाचे कामकाज मर्यादित स्वरुपात चालू होते ही बाब सर्वश्रृत आहे. प्रतिवादींची अर्जातील कथने ही शपथेवरती आहेत. त्यामुळे, ती ग्राहय धरावी लागतील. कैफियतीच्या स्वरुपात म्हणणे मांडण्याची संधी प्रतिवादीस देणे नैसर्गिक न्यायतत्वाच्या दृष्टीने गरजेचे आहे. तसे न झाल्यास निश्चितपणे नैसर्गिक न्याय तत्त्वाचे उल्लंघन होईल. प्रस्तुत प्रकरणी प्रतिवादींमुळे जो विलंब झाला, त्याकरीता काही रक्कम खर्च स्वरुपात प्रतिवादींवरती बसविणे योग्य राहील. सबब, वरील सर्व कारणास्तव खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो–

**– आ दे श –**

१) अर्ज (निशाणी क्र. २३) प्रतिवादीने वादी यांना आज तारखेपासून ७ दिवसांच्या आत रक्कम रुपये २००/– ही खर्च स्वरुपात देण्याच्या अटीवर प्रतिवादी क्र. १ ते ६ यांची कैफियत विलंब माफ करुन दाखल करुन घेण्यात येते.

Amol Bharat Jawale

Digitally signed by Amol Bharat Jawale
Date: 2022.11.25 13:37:08 +0530

कागल. **(अमोल भारत जवळे)**

दिनांक – २४/११/२०२२ सह. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, कागल.